जीवनामध्ये यशवंत, गुणवंत, विजयवंत, आणि किर्तीवंत होण्यासाठी

# मोरेसाहेब औक्षवंत व्हा!!

## सकस सहकार समृद्ध व्यापार यांचा प्रितीसंगम म्हणजेच काशिनाथ मोरे

"उद्योगश्री" पुरस्काराचे मानकरी श्री. मोरेसाहेब हे उद्योगातील अग्रणी ठरले! त्यांचा ५४ वा वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा होणार आहे. दि डेक्कन मर्चंट बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सहकारात बँकेचे नाव लौकिकपात्र आणि उज्ज्वल केले आहे. बँकेला सर्वांग सुंदर आणि आदर्श बँक म्हणून मिळवून दिला आहे. ते दादरचे भाजीपाला व्यापारी आहेतच. पण सामाजिक बांधिलकी स्वीकारून त्यांनी शैक्षणिक, धार्मिक कार्यामध्ये मोलाचा सहभाग दिला आहे. ज्या क्षेत्रात मोरेसाहेब पाऊल टेकतात ते क्षेत्र दैदिप्यमान आणि सबळ बनविण्यामध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या कुशल उद्योगाची पोचपावती म्हणून सन्मानपूर्वक 'उद्योगश्री' पुरस्कार लाभला आहे. त्यामुळे समाजातील आणि सहकारातील त्यांची गरुडझेप कौतुकास्पद ठरली आहे.

श्री. काशिनाथ दिनकर मोरे! दादरचे भाजीपाला व्यापारी. 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हे ब्रीदवाक्य मोरेसाहेबांची प्रेरणा ठरले. मुंबईत भायखळा येथे भाजीपाल्याचा धंदा सुरू केला. 'कांदा, मुळा भाजी अवघी विठाई माझी' याप्रमाणे मोरे साहेब यांनी भाजीपाल्यात परमेश्वर पाहिला आणि काशिनाथ दिनकर मोरे साहेबांचे रूपांतर के.डी.एम. च्या शंभर नंबरी सोन्यात झाले. संधीचे सोने करण्यात आणि तेही के. डी.एम च्या शंभर नंबरी सोन्यासारखं दर्जेदार करण्यात ते कुठेही कमी पडत नाहीत. याचे ताजे उदाहरण म्हणजे दि डेक्कन को-ऑप. बँकेच्या 'कोअर बँकिंग' सुविधेचा प्रारंभ करण्यात आला. यामुळे बँकेच्या सभासद, खातेदार, ठेवीदार, आणि ग्राहकांना 'एनीव्हेअर बँकिंग' एटीएम, आरटीजीएस, मोबाईल आणि इंटरनेट बँकिंग सुविधा मिळाल्या आहेत. अशी बँकेचे अध्यक्ष काशिनाथ मोरे यांनी माहिती दिली. दि डेक्कन मर्चंट को-ऑप. बँकेला 'राष्ट्रीय सहकारिता विकास तथा प्रशिक्षण प्रबंधन संस्था' या राज्यस्तरीय संस्थेचे प्रमाणपत्र मिळाले असून, रिझर्व्ह बँकेच्या मानकानुसार सर्व सक्षमतेच्या प्रमाणाचाही बँकेने पूर्तता केली आहे. त्यांच्या वाढदिवस सोहळ्यास सहकार क्षेत्रातील आणि व्यापार क्षेत्रातील अनेक मान्यवर मुद्दाम उपस्थित राहतात.



मोरे साहेबांचे कार्य आखीव-रेखीव आणि आत्मविश्वासावर आधारलेले असते. त्यामुळे ते नक्कीच यशस्वी होतात. भाजीपाला व्यापारी म्हणूनही त्यांचा लौकीक आहे. शुन्यातून विश्व निर्माण करण्याचं त्यांचं कसब वाखाणण्यासारखं आहे.

मोरेसाहेब यांच्या सहकार आणि व्यापार या दोन्ही क्षेत्रातील यशाचे श्रेय फक्त मोरेसाहेबांनाच देता येणार नाही. कारण प्रत्येक पुरूषाच्या पाठीशी एखाद्या सहनशील व कर्तव्यदक्ष महिलेचा खंबीर पाठींबा असतो. यामध्ये मोरेसाहेब सुध्दा अपवाद नाहीत. त्यांच्या पाठीशी त्यांच्या सौभाग्यवती नयनाताईंचा कर्तव्यनिष्ठ सहभाग आहे. त्यांनी घर, संसार व गावचा परिवार यांची जबाबदारी स्वीकारून ती यशस्वीपणे सांभाळली आहे. त्यामुळेच मोरेसाहेबांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला आहे. मोरेसाहेबांना आज जो सन्मान आणि समृध्दी लाभली आहे. त्यामध्ये सौ. नयनाताईंचा सिंहाचा वाटा आहे. घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती. तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती।' या बोधवाक्याप्रमाणे मोरे साहेबांचे घरकुल एक मंदिर आहे. मोठा मुलगा चि. गणेश वडीलांच्या भाजीपाला व्यापारात यशस्वी श्रीगणेशा करून मोलाची मदत करतो. चि. गणेश यांचा विवाह सोहळा आणि मोरेसाहेबांचा वाढदिवस असा प्रीतीसंगमाचा सुखसोहळा संपन्न होत आहे. हा वर्षपिताहमीचा योग आहे. नव्याकरूपातील लक्ष्मीच्या चि.सौ.कां रूपाली ची या अठवड्यात हळदीकुंकवाची पवित्र पाऊले या घरकुलावर सौख्य, समृध्दीची बरसात करतील कारण असंख्य हितचिंतकांचे आशिर्वाद चि. गणेश आणि चि.सौ.कां रुपाली यांच्या जीवनात सौख्याच्या वर्षात पुलकितील. कन्या मोनाली आईला कौटुंबिक सहकार्याचा हात देते. आता

(उर्वरित पान ९ वर)

## आदर, सद्भाव, सहकार यांचे सोयरे, नाव शोभते काशिनाथ दिनकर मोरे!!

पान १ वरून

# मोरेसाहेब औक्षवंत व्हा!!

तिला गोरीगोरीपान, फुलासारखी छान; नवी वहिनी मिळाल्यामुळे तिचा आनंद द्विगुणित होणार आहे. सर्वांत छोटे चिरंजीव म्हणजे, मराठी भाषेत शेंडेफळ म्हणतात ते चि. विशाल माध्यमिक शिक्षण पुर्ण करून कॉलेजची पायरी चढले आहेत. त्यांचं स्वप्न नावाप्रमाणे इतरांपेक्षा विशाल असणार याबद्दल वेगळे सांगायला नको. एकंदरीत मोरेसाहेबांना चतुर्भुज सहकार्य देणारे कुटुंब नम्रतातांईच्या नम्र शिकवणूकीने सुखात नांदत आहे. हीच मोरेसाहेबांची मुर्तीमंत प्रेरणा आहे.

दि डेक्कन मर्चंट को-ऑप. बँकेचे मोरेसाहेब सन्माननीय अध्यक्ष आहेत पण त्याबद्दलचा कसलाच गाजावाजा नाही. सर्व संचालक मंडळाला जसे मोरे साहेब आवडतात तसे संचालकांवर बंधूत्वाच्या नात्याने मोरेसाहेब प्रेम करतात. 'ज्याच्या हातात ससा तोच पारधी' असा स्वार्थी अन् लोभी विचार मोरेसाहेबांच्या वाऱ्यालही उभा



देणे हे अत्यंत प्रेरणादायी ठरणार आहे. दि डेक्कन मर्चंट को-ऑप. बँकेचे अध्यक्ष म्हणून तरूण, तडफदार आणि धाडशी नेतृत्व करीत असलेले मा.श्री. काशिनाथ मोरे साहेबांच्या हाती बँकेची सर्व सुत्रे सोपविली. नावातच 'नाथ' असलेल्या मोरे साहेबांनी बँकेची सर्वांगीण प्रगती आणि भरभराट करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सहकार समृध्दीचा त्यांनी ध्यास घेतला आणि बँकेच्या आर्थिक ताकदीमध्ये वाढ केली. मोरे साहेबांबद्दल बोलायचे म्हटले तर सहकार आणि व्यापार यांचा प्रितीसंगम म्हणजेच विद्यमान

भाजीची टोपली डोक्यावर घेण्यात त्यांना कसलाच संकोच वाटत नाही.

उद्योगच माझा गुरू तोच माझा कल्पतरू अशी त्यांची धारणा आहे. ते सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सहकार अशा विविध क्षेत्रात पुढकार घेऊन कार्य करतात त्यामुळे ते अनेक संस्था व मंडळावर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत त्यापैकी प्रामुख्याने कृषी उत्पन्न बाजार समिती वाशी येथील प्रतिष्ठित व्यापारी, महात्मा फुले क्रेडीट सोसायटीचे माजी संचालक, २२ वर्षे सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग, भायखळा मार्केट प्रिमायसेस सोसायटीचे सेक्रेटरी, श्रीराम वाटाय मंडळ, महाराष्ट्र उत्सव मंडळ (कबुतरपाडा), जयमल्हार वटाव मंडळ या तिन्हीही संस्थाचे अध्यक्ष आहेत. तसेच ए.पी.एम.सी . भाजीपाला मार्केट गणेशोत्सव मंडळाचे कार्याध्यक्ष, बृहन्मुंबई भाजीपाला व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष आहेत

राहत नाही. प्रयत्न, धैर्य, चिकाटी, या गोष्टी सहकार असो की व्यापार असो, मोरेसाहेबांच्या बरोबर वास करीत असतात. त्यांची काम करण्याची पद्धत सडेतोड आणि स्वच्छ असल्यामुळे ते कुणाला घाबरत नाहीत.

स्पष्ट आणि सत्य बोलण्याच्या त्यांच्या सात्विक वाणीमुळे त्यांचा जनसंग्रह नेहमीच वाढत राहिला आहे. अशा सहकार आणि व्यापार क्षेत्रात चमकणाऱ्या या शुक्रताऱ्याच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना तोंड भरून शुभेच्छा देऊन त्यांच्या उदात्त कार्याची ओळख करून अध्यक्ष काशिनाथ मोरे आहेत. उच्चारातुन विद्वत्ता, बोलण्यातुन नम्रता आणि सहकारातून समता हे त्रिवेणी पैलू मोरे साहेबांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे वाटतात. बँकेच्या महाव्यवस्थापकांपासून शिपायांपर्यंत ते सर्वांमध्ये खेळीमेळीने आणि जिव्हाळ्याने एकरूप झाले आहेत.

दि डेक्कन मर्चंट शेड्युल्ड बनविण्यासाठी त्यांची तळमळ वाखाणण्यासारखी आहे. श्री. काशिनाथ मोरे हे हाडाचे भाजीपाला व्यापारी म्हणून आज नवी मुंबई ए.पी.एम. सी मार्केटमध्ये प्रसिद्ध आहेत. आज जरी त्यांची आर्थिक ताकद बऱ्यापैकी असली तरी प्रसंगी

श्री . काशिनाथ मोरे यांचेबरोबर असलेले सर्व संचालक स्वत: उद्योजक, व्यापारी आहेत त्यामूळे त्यांना कष्टाची जाण आहे. गेल्या सहा वर्षात त्यामुळेच बँकेची ठोस प्रगती झाली आहे. यामुळेच लोकांचा मोरेसाहेब यांच्या नेतृत्वावर नितांत विश्वास आहे असे अष्टपैलू व्यक्तिमत्व लाभलेल्या श्री. काशिनाथ मोरेसाहेब यांना उदंड आयुष्य लाभून त्यांची वाटचाल भागयवंत ठरावी याच ५४ व्या वाढदिवसानिमित्त साप्ताहिक लोकवंदन परिवाराच्या कोटी कोटी शुभेच्छा.

– बबनराव कोळी